Review Of Research
ISSN:-2249-894X
Impact Factor : 3.1402(UIF)
Vol. 4 | Issue. 4 | Jan. 2015
Available online at www.ror.isrj.org

# *मोगल कालखंडातील (1526–1707) अंर्तगत व्यापार व्यवस्थाः एक अभ्यास*

*गौतम गोविंद सोनवणे*

सह–प्राध्यापक, इतिहास विभाग, एस.बी.कॉलेज, शहापूर, जि. ठाणे.

***सार :*** प्रस्तूत लेखामध्ये मोगलकालीन व्यापार कशाप्रकारे केला जात होता, त्या व्यापाराची साधने, मार्ग, वर्ग, केंद्रे आणि बंदरे इत्यादी विषयी सविस्तर माहिती दिली आहे. ''बाबरनामा'' ग्रंथात बाबराने भारत आणि काबूल मधील व्यापाराचे सविस्तर वर्णन केले आहे. त्याच्याकाळात अंतर्गत व्यापार सुरळीत चालत होता. कंदाहार, काबूल व्यापाराचे प्रमुख केंद्रे होती. हा व्यापार हूमायूनच्या काळातही सुरळीतपणे चालू होता. अकबर, जहांगीरच्या कालात अंतर्गत व्यापार तर सुरळीत होताच परंतु परराष्ट्रीय व्यापाराला अधिक महत्व दिसते. शहाजहानच्या काळात व्यापाराला स्थैर्य आले असले तरी परकीय व्यापार तेजीत होता. पुढे औरंगजेबाच्या काळात परराष्ट्र व्यापाराची पिछेहाट झाली. औरंगजेबाने आपल्या कारकिर्दीची बरीच वर्षे युध्दात घालवल्याने अंतर्गत व्यापारही मंदावला. त्याच्यानंतरच्या काळात व्यापारावर इंग्रजांचे वर्चस्व आले.

### *1.प्रस्तावना :*

मध्ययुगीन काळात भारतीय प्रदेशावर जी परकीयांची आक्रमणे झाली त्यापैकी मोगलांचे आक्रमण हे मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील एक मोठे स्थित्यंतर होते. 1526 च्या पानिपतच्या पहिल्या लढाईने भारत मोगलांच्या अधिपत्याखाली आला. कालांतराने हे परकीय आक्रमक भारतीय भूमीशी एकरूप झाले. भारतीय संस्कृतीच्या विकासात त्यांचा मोठा वाटा आहे. मोगल संस्थापक बाबरच्या स्वारीपासून बादशहा औरंगजेबाच्या मृत्युपर्यंत मोगलांचे साम्राज्य म्हणजे भारतातील एकमेव बलाढ्य सत्ता होती. बाबर–हुमायून या सुरुवातीच्या बादशहांना सततच्या युध्दामुळे आर्थिक आणि प्रशासकीय सुधारणांकडे लक्ष देता आले नाही. सम्राट अकबराच्या काळात मोगल साम्राज्य स्थिर स्थावर झाल्यानंतर विकासाच्या दृष्टीने प्रयत्न सुरु झाले. जहांगीर शहाजहानच्या काळात मोगली सत्ता वैभवाच्या शिखरांवर पोहोचली.

मोगलांनी 1526–1707 साधारणतः 300 वर्षे भारताच्या विस्तारीत प्रदेशावर राज्य केले. मध्ययुगात सामर्थ्यवान साम्राज्याची निर्मिती, दीर्घकालीन शांतता, नवीन शहरांचा व व्यापारी केंद्रांचा उदय, दळणवळणाच्या साधनामध्ये झालेली प्रगती, सुधारीत आणि प्रगत चलन व्यवस्था, मोगल बादशहांनी व्यापार उद्योगाला दिलेले सहकार्य यामुळे मोगल काळात व्यापारी क्षेत्रात प्रचंड प्रगती झाली. व्यापाराला या काळात चांगले स्थैर्य मिळाले. मोगल बादशहांनी व्यापार व वाणिज्य विकासाला आवश्यक त्या सोयी सुविधा पुरवल्या त्यामुळेच या काळात व्यापारात प्रचंड प्रगती झाल्याचे दिसते. मोगलांचे साम्राज्य विशाल असल्यामुळे देशात राजकीय शांतता होती. साहजिकच अंतर्गत व्यापार प्रगतीपथावर होता.

### *2.संशोधनाची उद्दिष्टे:*

मोगलकाळात होणाऱ्या अंतर्गत व्यापार व्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी पुढील उद्दिष्टे ठेवण्यात आली.

- मोगलकालीन व्यापाराची साधने आणि केंद्रे कोणती होती हे जाणून घेणे.
- व्यापारासाठी कोणत्या मार्गाचा वापर केला जात होता हे पाहणे.
- मोगलकालीन व्यापारामध्ये कोणता वर्ग सहभागी होता हे पाहणे.

### *3.मोगलकालीन व्यापाराची साधने :*

मोगल काळातील अंतर्गत व्यापार बैल, बैलगाडया, घोडे, खेचर, उंटांच्या सहाय्याने केला जात असे. क्वचित प्रसंगी हत्तीचा वापर केल्याचेही आढळते. समाजाला आवश्यक असणाऱ्या वस्तू, चैनीच्या वस्तू, निरनिराळी धान्य, सूती व रेश्मी कापड, मीठ, मिरे, गुळ, साखर, कापूस, सोने, चांदी, मसाल्याचे पदार्थ, कलात्मक वस्तू, घोडे, हत्ती व इतर प्राणी यांचा अंतर्गत व्यापार मोठ्या प्रमाणात चालत असे. देशातील एका भागातील माल ज्या भागात मालाला जास्त मागणी आहे तिथे नेवून विकला जात असे. त्यामुळे अंतर्गत व्यापारात मोठ्या प्रमाणावर फायदा होत असे.

### *4.मोगलकालीन व्यापारी केंद्रे :*

मोगल कालातील अनेक व्यापारी केंद्रे आणि बाजारपेठांविषयी माहिती मिळाली आहे. व्यापारी मार्गावरील मोठमोठी शहरे, राजधानीची ठिकाणे, तिर्थक्षेत्रे, पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरील बंदरे प्रमुख व्यापारी केंद्रे म्हणून उदयाला आली होती. त्याशिवाय काबूल, मुलतान, लाहोर, कंदाहार, दिल्ली, आग्रा, अलाहाबाद, लखनौ, जैतापूर, ढट्टा, मक्कर, बऱ्हाणपूर, एलिचपूर, ओरिसातील कटक, बंगालमधील सोनारगाव, ढाक्का ही प्रसिध्द व्यापारी केंद्रे म्हणून उदयाला आली होती. तर दक्षिणेकडे बऱ्हाणपूर दक्षिण भारताचे प्रवेशद्वार म्हणून ओळखले जात होते. मोगल बादशाहांनी या व्यापारी केंद्राला उत्तेजन दिले होते. व्यापाऱ्यांच्या सुखसोयीकडे लक्ष पुरवले होते. मोगल सत्तेच्या काळात एक संघ राजकीय सत्ता दिर्घकाळ चालल्यामुळे मोगल बादशाहांनी शेती, व्यापाराकडे विशेष लक्ष पुरवून स्थिर शासन निर्माण करून अंतर्गत व्यापार भरभराटीस आणला.

### *5.मोगलकालीन व्यापारी बंदरेः*

भारतातील पश्चिम किनाऱ्यालगत सिंधमधील लहरी बंदर, गुजरातमधील सूरत–कॅम्बे, महाराष्ट्रात चोळ, दाभोळ, राजापूर, गोवा, केरळमध्ये कालिकत, कोचीन ही बंदरे प्रमूख होती.तर भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील बंदरात पुलिकत विशाखापट्टनम्, बिमलीपट्टनम् बंगालमध्ये हूगळी, ओरीसामध्ये बालासोर ही बंदरे प्रसिध्दीस आली होती.

### *6.मोगलकालीन व्यापारी वर्गः*

मोगलकालीन भारतात व्यापारी वर्ग मोठ्या संख्येने अस्तित्वात होता. हा वर्ग देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पसरलेला असून त्यांच्यात संघटन अधिक होते. यामध्ये बंजारी, बनिया, बोहरी, पारसी, सौदागर यांचा समावेश होता. यातील काही व्यापारी दूरदूरपर्यंत ठोक व्यापार करीत असत त्यांना सेठ किंवा मोदी म्हणत असत. तर दुसरा वर्ग किरकोळ व्यापारी म्हणून प्रसिध्द होता त्यांना 'व्यापारी' म्हणत असत. हे व्यापारी गावागावातून अन्नधान्य आणि नगदी पिक खरेदी करीत असत. यांच्या शिवाय व्यापाराच्या क्षेत्रात 'बंजारा' वर्गही सामील होता. हा वर्ग मालाची ने–आण करीत होता. अन्न धान्य, डाळी, मीठ, साखर यांचे ओझे बैलावर लादुन बंजारा वर्ग ने–आण करीत होता. सुती, रेश्मी कापडासारख्या महाग वस्तु खेचर किंवा गाडीतून वाहून नेल्या जात असत. मोगल कालीन अंतर्गत व्यापारात वस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठी एक स्वतंत्र जाळे तयार केले होते. ठोक व्यापारी दलालांच्या माध्यमातून स्थानिक किरकोळ व्यापाऱ्यांशी जोडले गेले होते. मोगल कालात भारतात व्यापारी क्षेत्रात कोणत्या एका जाती किंवा धर्माचा संबंध दिसत नाही. हिंदू, जैन, मुस्लिम सर्व धर्माचे लोक सहभागी असल्याचे दिसते. मोगल काळातील व्यापार आणि उद्योगांच्या भरभराटीमागचे हे एक प्रमुख कारण मानले जाते.

### *7.मोगलकालीन व्यापारी मार्गः*

मोगल कालखंडातील अंतर्गत व्यापार प्रामुख्याने तीन मार्गांनी चालत होता. सागरी मार्ग, नदीमार्ग आणि खूष्कीच्या मार्गाने हा व्यापार सुरळीत चालत होता. यापैकी समुद्रमार्गे चालणारा व्यापार अधिक सुरक्षित आणि फायदेशीर होता कारण खूष्की मार्गाप्रमाणे रस्त्यांची अडचण आणि दरोडेखोरांची भीती नव्हती. तर खूष्कीच्या मार्गाने चालणारा व्यापार हा अडचणीचा आणि कठीण होता. कारण पक्क्या रस्त्यांच्या सुखसोयी नव्हत्या. प्रवासाची आणि दळणवळणाची साधने अतिशय अप्रगत होती, किनाऱ्यांवरील व्यापारातही चाच्यांकडून नेहमीच धोका असे. त्यामुळे सागरीमार्गाने चालणारा अंतर्गत व्यापार अधिक सोयीचा असल्याने हा व्यापार प्रगतीपथावर होता. सागरी व्यापार सप्टेंबर पासून मे महिन्यापर्यंत मोठ्या प्रमाणावर चालत असे. जून, जूलै, ऑगस्ट या काळात पावसाचे प्रमाण अधिक असल्याने व्यापारात बाधा, अडचणी येत असत.या काळात उत्तरेतील खंबायत पासून दक्षिणेतील कोचीनपर्यंत व्यापारी जहाजांना संरक्षण देणाऱ्या संरक्षक गलबतांचे अस्तित्व होते.साधारणतः संरक्षक गलबतांचे तीन गट दोन पश्चिम किनाऱ्यावर आणि एक पूर्व किनाऱ्यांवर सागरी वाहतूकीचे नियंत्रण करीत असत. पहिला गट खंबायत ते गोवा दुसरा गट गोवा ते कोचीन आणि पूर्वेकडील किनाऱ्यावर तिसरा गट संरक्षणाचे काम करीत असे.

मोगलकालीन अंतर्गत व्यापारात नदीमार्गे होणारा व्यापार अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जातो.भारतातल्या मोठ्या आणि महत्त्वाच्या नद्यांमधुन हा व्यापार चालत असे. त्यामध्ये प्रामुख्याने सिंधु, गंगा, तापी, रावी, झेलम, चंबळ आणि शोण इ. नद्यांचा समावेश होता. सिंधू नदी ही सिंध, मुलतान, लाहोर व काश्मिर प्रदेशातून वाहत होती. या प्रदेशात तयार होणाऱ्या वस्तु सिंधू आणि तिच्या उपनद्यांमधून बंदरात आणून जहाजात भरुन जहाज परत पाठवत असत. म्हणूनच किनाऱ्यावरील मट्ठा, भक्कर, मुलतान ही

शहरे विकसीत झाल्याचे दिसून येते. याशिवाय या काळात गंगा, यमुना, चंबळ, शोण घोग्रा या नद्यांमधूनही हा व्यापार सुरळीत चालत होता.या जलमार्गामुळे उत्तर भारतातील व्यापाराला मोठे उत्तेजन मिळाले. हा जलमार्ग बंगालच्या त्रिभुज प्रदेशाला जोडला होता.मोठमोठी औद्योगीक केंद्रे या प्रदेशातील महत्वाच्या नद्यांच्या किनाऱ्यावर वसलेली होती. उदा. दिल्ली, आग्रा, अलहाबाद, जौतपूर, ढाक्का, सोनारगाव इ. तांदूळ, मिठ, नीळ, शिसे, कापूस या वस्तु गंगा–जमूना नदीच्या जलमार्गातून बंगालला पाठवण्यात येत असे.बंगालमधून हा माल सोनारगाव आणि ढाक्का या देशांतर्गत बाजारपेठांमध्ये पाठवण्यात येत असे. पूर्व आणि पश्चिमेकडील देशांना सातगाव आणि हूगळी या बंगालच्या त्रिभूज प्रदेशाच्या मूखाशी असलेल्या शहरातून निर्यात केला जात असे. त्याचप्रमाणे या सागरीबंदरामध्ये उतरवला जाणारा माल आयात केला जात असे.

### *8.समारोपः*

मोगल कालखंडात संस्थापक बाबरापासून ते सम्राट अकबरापर्यंतच्या काळात देशांतर्गत व्यापार प्रगतीपथावर असल्याचे दिसते. शहाजहानच्या कारकिर्दीत अंतर्गत व्यापाराबरोबरच परराष्ट्रीय व्यापारातही प्रगती झाली. औरंगजेबानंतर व्यापाराची पिछेहाट सुरू झाली. व्यापारावर इंग्रजांचे वर्चस्व आले.

### *संदर्भ :*

1.नलावडे विजय, कदम विकास आणि शिंदे सुखदेवः मुगलकालीन भारताचा इतिहास, सोलापूर, अक्षरलेणं प्रकाशन, 2012
2.भिडे गजानन, नलावडे विजय आणि नाईकनवरे वैजयंतीः मध्ययुगीन भारत, कोल्हापूर प्रकाशन,2002
3.देशपांडे वसंतःमध्ययुगीन भारताचा इतिहास, नांदेड, अभय प्रकाशन, 2008
4.त्रिवेदी आर. एस.ःमध्यकालीन भारत, नई दिल्ली, विश्वभारती पब्लिकेशन, 2008
5.कठारे अनिलःमध्ययुगीन भारताचा इतिहास, जळगाव, प्रशांत पब्लिकेशन, 2013



***गौतम गोविंद सोनवणे***
सह–प्राध्यापक, इतिहास विभाग, एस.बी.कॉलेज, शहापूर, जि. ठाणे.

